दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १५३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## एनआयएकडून दाऊदवर २५ लाखांचे बक्षीस जाहीर

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम आणि त्याच्या साथीदारांवर बक्षीस जाहीर केले आहे. एनआयएने दाऊद आणि त्याच्या इतर सहकाऱ्यांविरोधात याआधीच गुन्हे दाखल केले आहेत. त्यानंतर एनआयएने दाऊद आणि त्याच्या टोळीतील इतर गँगस्टरविरोधात बक्षीस जाहीर केले आहे. दाऊद विरोधात २५ लाखाचे बक्षीस जाहीर केले आहे.

राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमवर २५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले.

तर, त्याचा विश्वासू सहकारी समजला जाणऱ्या छोटा शकीलवर २० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. दाऊद इब्राहिमचा भाऊ अनिस इब्राहिम, जावेद पटेल उर्फ जावेद चिकना आणि टायगर मेमनवर प्रत्येकी १५ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले आहे. अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमसह इतर टोळीच्या सदस्यांवर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. तपास यंत्रणेकडून याचा तपास सुरू आहे.

# पनवेल तालुक्यात दीड दिवसांच्या गणपतींचे विसर्जन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**कोरोनाच्या पार्श्वभूमीवरती गेले दोन वर्षे गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्यात आला होता. मात्र यावर्षी नागरिकांचा उत्साह व्दिगुणीत होताना दिसला. महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कोमोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात संध्याकाळी पाच वाजेपर्यंत २००हून अधिक घरगुती गणपतींचे भावपूर्ण वातावरणात नियोजनबध्दरित्या दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन करण्यात आले.**



आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी पालिकेने गणोत्सवाची जय्यत तयारी केली आहे. गणेशभक्तांच्या सोयी सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग या ७ विभागांच्या माध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रात एकुण ६१ ठिकाणी भक्तांना गणेश विसर्जनाची सोय करण्यात आली होती. यामध्ये खारघर मध्ये ३७ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली असून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत खारघर प्रभागामध्ये ४७ गणेश मुर्तींचे विसर्जन करण्यात आले होते. कळंबोली प्रभागामध्ये ९ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली असून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत येथे ६६ गणेश मुर्तींचे विसर्जन करण्यात आले होते. कामोठे प्रभागामध्ये ६ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली असून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत २६ गणेश मुर्तींचे विसर्जन करण्यात आले होते.

पनवेल प्रभागामध्ये ९ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली असून संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ६१ गणेश मुर्तींचे विसर्जन करण्यात आले होते. चारही प्रभागांमध्ये कृत्रिम तलाव, विद्युत व्यवस्था, मंडप, बॅरिगेटिंग, गणेश मूर्तींची नोंदणी, लाऊड स्पीकर, लाईफ जॅकेट, तराफा निर्माल्य कलशाची सोय करण्यात आली आहे. आयुक्त श्री. गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जन घाटांवर महापालिकेच्यावतीने अग्निशमन दल, वाहतूक विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, घनकचरा व आरोग्य विभाग तसेच पोलिस विभागाच्यावतीने चोख बंदोबस्त करण्यात आला होता. विसर्जनावेळी गर्दी होऊ नये यासाठी महापालिकेने नागरिकांसाठी ऑनलाईन टाईम स्लॉट बुकिंग प्रणाली विकसित करून दिली होती. याला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.



पनवेल येथे पोतदार कुटुंबियांच्या घरी स्थानापन्न झालेले श्री गणराय.


# रोहा तालुक्यात दिड दिवसांच्या ६९० बाप्पांना भावपूर्ण निरोप

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यात भावपुर्ण वातावरणात दिड दिवसांच्या ६९० बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. बुधवारी मोठ्या उत्साहात बाप्पांचे आगमन झाले, आज ढोल, ताशांच्या आणी टाळ, मृदुंगाच्या गजरात पुढच्या वर्षी लवकर या असे म्हणत भक्तगणांनी आपल्या अवडत्या बाप्पाला दीड दिवसांनी निरोप दिला. यावेळी शहरातील विसर्जन स्थळांवार मोठी गर्दी झाली होती.

गणपती विसर्जनासाठी नगरपालिके तर्फे विसर्जन स्थळांवर विशेष व्यवस्था आणी विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रोहा शहरातील दमखाडी घाट ,बंदर पकटी घाट, अष्टमी घाट व फरशी घाट अशी ४ प्रमुख वीसर्जन घाटांची स्वच्छता करण्यात आली होती. दुपारी ४ वाजल्यानंतर वाजत गाजत, काहीतर गुलाल उधळत, लेझिम, टाळ मदुंग, ढोल ताशाच्या गजरात श्री गणरायांचे विसर्जन करण्यासाठी गर्दी उसळली होती.

एका मागुन एक घरगुती गणपती विसर्जनासाठी नदी किनारी निघाले होते. तत्पुर्वी महसुल आणि पोलिस प्रशासनाच्या वतीने दुपारी शहरातील विसर्जन स्थळांकडे जाणारे मार्ग मोकळे रहावेत यासाठी गस्त घालण्यात आली.



भक्तगणांनी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या असे गजर करीत कुंडलिका नदी किनारी भावपुर्ण आणि भक्तीमय वातावरणात गणरायांचे विसर्जन केले.

यावेळी कोण्ताही अनुचित प्रकार घडु नये यासाठी पोलिसांनी विसर्जन मार्गावर आणि नदी किनारी चोख बंदोबस्त ठेवले होते. रोहा तालुक्यात दिडदिवसांच्या एकुण ६९० बाप्पांचे विसर्जन करण्यात आले असल्याची माहीती रोहा पोलिस निरीक्षक प्रमोद बाबर यांनी दिली.

## संक्षिप्त...

### आज दहावी-बारावी पुरवणी परीक्षेचा निकाल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी, बारावी पुरवणी परीक्षेचा निकाल शुक्रवार(दि. २ सप्टेंबर) रोजी दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर होणार आहे. शिक्षण मंडळातर्फे २७ जुलै ते २४ ऑगस्ट या कलावधीत दहावी बारावीची परीक्षा घेण्यात आली होती. www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना निकाल पाहता येणार आहे.

या संस्थेतस्थळावर विद्यार्थ्यांचे विषयनिहाय गुण उपलब्ध होतील. ऑनलाईन निकालानंतर लगेचच दुस–या दिवसापासून दह–ावी, बारावी पुरवणी परीक्षेस प्रविष्ठ झालेलया विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने शाळा, महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

गुणपडताळणीसाठी ३ ते १२ सप्टेंबर पर्यंत व छायाप्रतीसाठी ३ ते २२ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन पध्द–तीन अर्ज करता येईल. उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असेल.

## सोनसाखळीसाठी नागोठण्यातील तरुणाने घेतला स्वत:च्याच मित्राचा बळी

### खुनाच्या घटनेने नागोठणे हादरले : रोठच्या घटनेची पुनरावृत्ती

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

पैशांची गरज असलेल्या २३ वर्षीय तरुणाने आपल्या १८ वर्षीय मित्राचा बळी घेतल्याची घटना नागोठण्यात सोमवार दि. २९ ऑगस्ट रोजी घडली आहे. गळ्यातील सोन्याची चैन न दिल्याने ती मिळविण्यासाठी नागोठण्यातील आंगरआळी येथील प्रितेश केदारी याने कुंभार आळीतील त्याचा जिवलग मित्र साहिल संजय कडू याच्या मानेला दोरीने आवळून खून केला. या घटनेने संपूर्ण नागोठणे शहर हादरून गेले असून काही वर्षांपूर्वी रोठ(रोहा) येथील तरुणाचाही त्याच्या मित्रांनी अशाचप्रकारे खून केल्याने या घटनेची पुनरावृत्ती नागोठण्यात झाली आहे.



साहिल कडू हा मित्रासोबत बाहेर जातोय असे आई–वडिलांना सांगून २९ ऑगस्ट रोजी दुपारी १.५० वा. च्या सुमारास घरातून निघून गेला होता. खूप वेळ होऊनही तो घरी न परतल्याने तसेच आजूबाजूच्या परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेऊनही तो न सापडल्याने ३० ऑगस्टला नागोठणे पोलीस ठाण्यात त्याचे वडील संजय कडू यांनी मुलगा हरविल्याची तक्रार दाखल केली होती.

त्यानुसार नागोठणे पोलीस ठाण्यात नव्यानेच रुजू झालेले पोलीस निरीक्षक राजन जगताप यांनी आपल्या अनुभवाचा कस लावत मृत साहिल याच्या मोबाईल कॉलच्या तपशीलाच्या आधारे जलदगतीने तपास करून ३० ऑगस्ट रोजीच सर्व संशयितांना ताब्यात घेतले. यातील मुख्य संशयित प्रितेश केदारी याची कसून चौकशी करतांना त्याला पोलिसी खाक्या दाखविताच त्याच्याकडून या खूनाच उलगडा झाला. आरोपी प्रितेशकडूनच मिळालेल्या माहितीनुसार वासगाव रस्त्यालगतच्या जंगलात मारून टाकलेला साहिलचा मृतदेह पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आला.

…/२

## प्रेयसीचा खून करून मृतदेह जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

### आरोपीला मुरुड पोलिसांनी केले अटक

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड गारंबी जंगलात फणसवाडी नजीक अज्ञात महिलेचे अर्धवट जळालेल्या अवस्थेत प्रेत आढळून आले. फणसवाडी गावातील मेंढपाळाच्या निर्दशनास ही बाब लक्षात येताच त्यांने तात्काळ पोलिस पाटील पांडुरंग दौलत पानगळे यांना माहिती दिली. पानगळे यांनी मुरुड पोलिसांना सदर घटनेची माहिती दिली. या घटनेनंतर मुरुड तालुक्यात खळबळ उडाली आहे.


प्रेम प्रकरणातून प्रेयसीचा खून करुन तिला जाळून टाकणार्या आरोपीस मुरुड पोलिसांनी अटक केली. मुरुड पोलीस ठाणे हद्दीत फणसवाडी गावाकडे जाणार्या रस्त्याच्या बाजूला जंगल भागात एका महिलेचा मृतदेह अर्धवट स्थितीत जळालेल्या स्थितीत सापडला होता.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नितीन गवारे हे घटनास्थळी पोहचून तातडीने तपासास सुरुवात केली. श्वान पथक, ठसे तज्ज्ञांकडूनही तपास करण्यात आला. अधिक तपासाअंती मुरुड पोलिसांना मांडवा पोलीस हद्दीत एक महिला बेपत्ता असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तपास केला असता ती महिला हीच असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी मग वेळ न दवडता मांडवा येथील सचिन दिनेश थळे याला ताब्यात घेतले. त्याला पोलिसी खाक्या दाखविताच त्यानेच हे कृत्य केल्याचे कबूल केले. मांडवा येथेच राहणार्या सचिनचे त्याच गावातील युवतीशी प्रेमसंबंध होते. काही कारणावरून या दोघांमध्ये जोरदार भांडण झाले. आरोपीने मनात राग धरून तिला मुरुडला आणून जीवे ठार मारले. पुरावा नष्ट करण्यासाठी जंगल भागात मयत महिलेच्या अंगावर लाकडे रचून मृतदेह

…/२

## मुंबई-पुणे एक्सप्रेसवर अपघातात ट्रक चालकाचा मृत्यू



**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर पुणे लेनच्या दिशेने अशोक लेलॅन्ड ट्रक क्र.एमएच ४० बीएल ५५६९ चालक एम.हनुमंत शरणप्पा वय.३८ वर्षे रा.कर्नाटक हे पुणे बाजूकडे दुसरे लेनने जात असताना त्याचे पाठीमागून आलेला अशोक लेलॅन्ड १६१५ क्र टेम्पो क्र.एमएच ०१ डीआर १३४७ वरील चालक सुभाषचंद्र गौतम वय.४१वर्षे रा.टिटवाळा–कल्याण, जिल्हा.ठाणे यांचा त्यांच्या गाडीवरील त्यांचा ताबा सुटून पुढे जाणाऱ्या अशोक लेलॅन्ड ट्रकला धडकला.

सदर अपघातात अशोक लेलॅन्ड वरील चालक सुभाषचंद्र गौतम हा अत्यंत गंभीर जखमी झाला व तो टेम्पोमध्ये अडकला होता. त्याला देवदूत रेस्क्यू टीम व आय.आर.बी. स्टाफच्या मदतीने त्यांना बाहेर काढून तात्काळ आयआरबी ऍम्ब्युलन्स मध्ये डॉक्टर यादव यांनी तपासण्यात आले. यावेळी डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले आहे. मयत सुभाषचंद्र गौतम यांचा मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी खाजगी रुग्णवाहिकेने पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले आहे. अपघातग्रस्त टेम्पो आयआरबी क्रेनच्या साह्याने

…/२

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ‘शिवतीर्थ’वर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील सत्तांतरानंतर पहिल्यांदाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मनसे प्रमुख राज ठाकरेंच्या शिव–तीर्थ निवासस्थानी पोहोचले. यंदा पहिल्यांदाच ठाकरे कुटुंबियांनी घरी गणपती बसवला असून गणेश दर्शनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री शिंदे संध्याकाळी राज ठाकरेंच्या दादर येथील शिवतीर्थ या निवासस्थानी पोहोचले. एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांच्या घरी बाप्पाचे दर्शन घेतल्यानंतर राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात गप्पाही रंगल्या. त्यामुळे या भेटीची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.



राज ठाकरेंच्या भेटीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, सगळीकडे गणपतीचं आगमन झालंय. राज्यात उत्साहाचं आनंदाचं वातावरण पाहतोय. त्यामुळे गणेशोत्सवानिमित्त भेटीगाठी सुरू आहेत. राज ठाकरेंच्या घरी गणरायाचं दर्शन घेण्यासाठी आलो. मागे राज ठाकरेंचं ऑपरेशन झालं होतं. त्यामुळे गणपती दर्शन आणि प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी सदिच्छा भेट घेतली असं त्यांनी सांगितले.

तसेच या भेटीत राजकीय चर्चा झाली नाही. ही सदिच्छा भेट होती. गणेशोत्सवाचा मुहूर्त

…/२

# नियोजनाची कोती दृष्टी

राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात येणाऱ्या दिल्लीतील दोन गगनचुंबी इमारती पाडून टाकण्याचा अंतिम आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला होता. त्यानुसार, रविवारी या दोन्ही इमारतींमध्ये स्फोटके भरून आणि नियंत्रित स्फोट करून त्या पाडण्यात आल्या. या इमारती काही सेकंदात जमीनदोस्त होत असताना या कठोर निर्णयातून सर्वोच्च न्यायालयाला अभिप्रेत असणारा संदेश देशभरात जाईल किंवा नाही, हे सांगता येत नाही. याचे कारण, महाराष्ट्रात पिंपरी चिंचवड, उल्हासनगरसहित अनेक शहरांमध्ये अनधिकृत म्हणजे बेकायदा बांधकामे नियमित करण्याची टूमच निघाली आहे. एका बाजूला, महाराष्ट्रातील आधीचे सत्ताधारी आणि आजचे सत्ताधारी यांच्या राजकीय संघर्षात प्लॅनप्रमाणे न बांधलेल्या इमारती, किनारी नियम धुडकावून बांधलेले रिसॉर्ट्स, घरातील बदललेली अंतर्गत रचना या साऱ्यांवर करडी नजर ठेवून दोन्ही बाजूंनी कारवाया झाल्या आहेत. आजही याच्या कोर्टकचेऱ्या चालू आहेत. मग राज्यातील साऱ्या शहरांमधील नियोजन प्रक्रियेची ऐशी की तैशी करून टाकणाऱ्या हजारो अनधिकृत बांधकामांना दर काही वर्षांनी नियमित कसे काय केले जाते? मुंबईतील झोपडपट्ट्यांबाबतही कायम हेच होत आले आहे. आज महामुंबईत बहुतेक मोकळ्या सरकारी भूखंडांचा काही भाग हा अनधिकृत झोपड्यांनी व्यापला आहे. संयुक्त महाराष्ट्र होण्यापूर्वी तत्कालीन महाद्वैभाषिकाचे मुख्यमंत्री असणारे दिवंगत मोरारजीभाई देसाई हे अतिक्रमणे, बेकायदा बांधकामे आणि भूखंडांच्या चोऱ्या याबाबत अतिशय कडक होते. मुंबईत उद्योगांच्या व इतरांच्या मदतीने हजारो छोटी घरे, वसाहती उभ्या राहू देत. मात्र, बेकायदा अतिक्रमण किंवा बांधकाम एकही होऊ देता कामा नये, अशी त्यांची भूमिका असे. ती त्यांनी काही काळ राबवली. अर्थातच त्यांचे हात नंतर बांधले गेले. पुढे ते केंद्रातच गेले. आज याच्या अगदी उलट स्थिती आहे. नगर नियोजन, वाहतूक, जलपुरवठा, इतर आनुषंगिक नागरी सुविधा या साऱ्यांची विल्हेवाट लावणारी बेकायदा बांधकामे कधी एकदा नियमित करतो आहोत आणि एकेक मतपेढी भरून टाकतो आहोत, याची जणू राजकीय नेत्यांमध्ये सुप्त चढाओढच लागलेली असते. प्रशासनाने अशावेळी खंबीर भूमिका घेणे अपेक्षित असते. मात्र, आज कारणे काही का असेनात सर्वच पातळीवरच्या नोकरशाहीच्या पाठीचे कणे मेणाचे झाले आहेत. मुंबई महानगर क्षेत्रातील महत्त्वाचे उपनगर असणाऱ्या उल्हास नगरमधील बेकायदा बांधकामे या आधी सन २००५ मध्ये नियमित करण्यात आली होती. त्यानंतर १७ वर्षे काहीच निर्णय न झाल्याने सारे चिंतातुर होते. आता एकदत सन २०२१ पर्यंतची सारी अनधिकृत कामे नियमित करण्यात आल्याने सारेच खूष झाले आहेत. आता म्हणे, पुनर्विकासाला गती येईल. म्हणजे, मुळात बेकायदा बांधकामे. आता ती पाडून नवी, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक घेऊन कायदेशीर टॉवर उभे राहणार. पुण्याचे जुळे महानगर असणाऱ्या पिंपरी चिंचवडचा बराच भाग सुनियोजित बांधकामांचा होता. तेथे गेल्या काही दशकांत ६० ते ७० हजार अनधिकृत बांधकामे उभी राहिल्याचे म्हटले जाते. गेल्या काही दिवसांमध्ये 'महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियमा'नुसार अनधिकृत असणारी कामे नियमित करण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू झाली आहे. ही नवी दहा हजार अनधिकृत बांधकामे असावीत, असा अंदाज आहे. राज्य सरकारने सन २०२१ मध्ये राज्यातील सर्वच गुंठेवारी बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला होता. तसे विधेयकही विधिमंडळात आले होते. यात मध्यमवर्गी कुटुंबांनी फारशी चौकशी किंवा कायदेशीर बाजू तपासून न पाहता मूळच्या वतनी किंवा कृषी जमिनीवर बांधलेली घरे किंवा अशा जमिनींवर बांधण्यात आलेल्या गृहरचना संस्था आणि कोणत्याही सरकारी किंवा सार्वजनिक जागांवर अतिक्रमण करून बांधलेली घरे यांच्यात फरक करण्याची आवश्यकता आहे. मोठ्या शहरांमध्ये हजारो गुंठेवारी बांधकामे पाडून टाकता येणार नाहीत, हे तर खरेच आहे. मात्र, त्यांचे नियमन व्हायला हवे. नागरिकांनीही यातील कायदेशीर तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे. राज्यातल्या सर्वच महापालिकांच्या हद्दी कायम ठेवणे किंवा वाढवणे आणि आसपासची गावे महापालिकेत समाविष्ट करून घेणे हे गेल्या दोन दशकांमधील राजकारणाचे एक अत्यंत प्रभावी प्यादे होऊन बसले आहे. सर्वच राजकीय पक्षांनी या प्याद्याचा हवा तसा वापर करून घेतला आहे. मात्र, यात रोजगारासाठी शहरांकडे धावणारा सामान्य माणूस अडकतो आणि कुठेतरी राहताना नियमांच्या ओझ्यांखाली चिरडलाही जातो. दर काही काळाने बेकायदा बांधकामे नियमित करून मतपेढ्यांची बेगमी करण्यापेक्षा राज्यातील सर्वच शहरांचे विकास आराखडे प्रामाणिकपणे आखणे आणि नंतर ते राबवणे, हा खरा त्यावरचा उपाय आहे. मात्र, काहीतरी तात्कालिक लोकहिताचे निर्णय घेतल्याचा भास निर्माण करायचा आणि प्रश्नांना मुळातून हात न घातला काहीतरी तात्पुरती मलमपट्टी करीत राहायचे, असा खाक्या आहे. राज्यभरात सध्या बेकायदा बांधकामे नियमित करण्याचा जो धडाका चालू आहे, तोही अशा कोत्या विकासदृष्टीचेच प्रतीक आहे.

# कळंबोलीत मनसेचे पूजेच्या साहित्याचे मोफत वाटप

**दै.रायगड नगरी । कळंबोली**



गणेश उत्सव काळात विविध पक्ष व संघटनांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून आपली आगळीवेगळी छबी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र कळंबोलीतील मनसेचे महानगर प्रमुख नितीन काळे यांनी गणेशोत्सवात महत्त्वाचे असणारे पूजेचे साहित्य मोफत पणे गणेश भक्तांना वितरण करून एक आपला आगळावेगळा ठसा निर्माण केला आहे .कळंबोलीत या उपक्रमाचे समाजाकडून कौतुक केले जात आहे.

कळंबोली तील मनसेचे महानगर प्रमुख नितीन काळे विविध सामाजिक उपक्रम राबवून आदर्श समाजसेवकाची भूमिका बजावत आहेत. गणेश उत्सवात पूजेचे साहित्य हे महत्त्वाचे असल्याने नागरिकांना पूजेचे साहित्य व आरती संग्रह मोफत पणे देण्याचा संकल्प त्यांनी केला. या संकल्पना उपक्रमाचे उद्घाटन शर्मिला ठाकरे यांच्या हस्ते शिवतीर्थ या निवासस्थानी करण्यात आले .त्यानंतर कळंबोलीत त्यांनी गणेश पूजनाचे साहित्य व आरती संग्रह मोफत वाटप केले आहे. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कळंबोलीतील नागरिकांनीही स्वागत केले आहे .भविष्यातही असेच विविध उपक्रम राबवून मनसे घराघरात पोहोचवण्याचा प्रयत्न सर्वतोपरी करणार असल्याचे नितीन काळे यांनी सांगितले आहे.

# मा.नगरसेवक राजू सोनी यांनी तत्परतेने करून दिले खचलेल्या रस्त्याचे काम पूर्ण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे कार्यतत्पर मा.नगरसेवक राजू सोनी तत्परतेने खचलेल्या रस्त्याचे काम स्वःखर्चाने पूर्ण करून दिल्याने नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.


शहरातील कोळीवाडा येथील काही भागाचा रस्ता खचलेला होता. या संदर्भात तेथील रहिवाशांनी पनवेल महानगरपालिकेशी संपर्क साधून तक्रार सुद्धा केली होती. गणेशोत्सवाच्या काळात येथून ये-जा करताना नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले असते. ही बाब स्थानिकांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ मा.नगरसेवक राजू सोनी यांच्याशी संपर्क साधला व सदर रस्त्याचे काम पूर्ण करून देण्याची मागणी केली. राजू सोनी यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवून व गणपती बाप्पांचे आगमन व विसर्जन सुखरुप व्हावे या दृष्टीने त्वरित स्वःखर्चाने त्या परिसरातील रस्ता तात्काळ सुस्थितीत बनवून दिला. याबद्दल तेथील रहिवाशांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# विश्वातील आसुरी शक्तीचे उच्चाटन करताना त्याचा प्रारंभ पनवेल पुण्यनगरीतून करावे

## पनवेलचा महागणपतीला सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांचे साकडे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेव्हा जेव्हा अधर्म, अत्याचार, अन्याय पराकोटीला जातो, संतसज्जनाला नाहक त्रास देण्याकरिता आसुरी शक्ती साम, दाम, दंडाचा वापर करतो तेव्हा तेव्हा परमेश्वर पृथ्वीवर अवतार धरण करतो, या भगवंत वचनाची आठवण देत विघ्नहर्त्याला साकडे घालत आता खुप झाले... सामान्यांची होणारी ससेहोलपट, राजकीय आणि इतर क्षेत्रात माजलेले असुर अत्याचार करून विश्वाचा समतोल बिघडवू पाहत आहेत. देव, देश आणि धर्माच्या नावावर उखल पांढरे करून सामान्यांना जगणे मुश्किल करत असल्याने त्या असुरांचे समूळ उचाटन करताना त्याची सुरुवात पनवेल पुण्य नागरितून करावी असे साकडे सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी पनवेलचा महागणपतीला घातले.



महागणपतीचे महापुजन कांतीलाल कडू आणि अखंड सौभाग्यवती रूपा कडू यांनी हिंदू धार्मिक पद्धतीने देवा ब्राह्मणाच्या साक्षीने वेदघोष आणि अथर्वशिर्षाच्या पठणात केले. त्यावेळी कडू यांनी सामाजिक परिस्थितीवर भगवंताला त्याच्या यदा यदा ही धर्मस्य या वचनाची आठवण करून दिली.

पनवेलला प्रचंड राजकीय दहशत पसरली आहे. हम करे सो कायदा यामुळे पनवेल विकासापासून कोसो दूर राहिली आहे. काही मुठभरांनी जमिनी लाटून, काळ्या धनातून देवांनाही वेठीस धरले आहे. आसुरी शक्ती प्राप्त करण्यासाठी ब्लॅक मॅजिकचा आधार घेतला आहे. बंगाली बाबा, काही भक्तीणीमार्फत स्वतःच्या डगमगलेल्या अस्तित्वाला आणि तंबूला टेकू दिले आहे. त्या सर्वांनाच धडा शिकवत विश्वातील आसुरी शक्ती उखडून फेकून देण्यासाठी मुलाधर चक्राचा स्वामी असलेल्या महागणपतीने प्रकट व्हावे आणि सुरुवात पनवेलपासून करावी असे साकडे कडू यांनी घातले आहे. आज पहिल्याच दिवशी महागणपतीच्या चरणी भक्तांची अलोट गर्दी लोटली होती. नयनरम्य दृश्य आणि महागणपतीच्या लीला अनुभवत अनेकांनी प्रसन्न चेहऱ्याने दर्शन घेतले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## सोनसाखळीसाठी नागोठण्यातील तरुणाने घेतला स्वतःच्याच मित्राचा बळी

नागोठण्यातील कोएसो अग्रवाल हायस्कूलच्या पुढे व वासगावकडे जाणाऱ्या रस्त्याच्या डाव्या बाजूला पायवाटेने जाणाऱ्या जंगलभागात २९ ऑगस्टलाच दुपारी ३ वा .च्या. सुमारास हा खून झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. प्रितेशला पैशाची गरज असल्याने त्याने साहिलच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरदस्तीने घेण्याचा प्रयत्न केला. मात्र साहिलने त्यास विरोध केल्याने झालेल्या झटापटीत आरोपी प्रितेश याने त्याच्या जवळ असलेल्या दोरीने साहिलचा गळा आवळून त्यास जीवे ठार मारले.

साहिलची सोन्याची चैन विकण्यासाठी गेलेल्या प्रितेश यांच्या सोबत अजून २-३ जण असल्याची माहिती उपलब्ध झाल्याने या खून प्रकरणात आणखी काहीजण असल्याचा संशय मृताच्या नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. पोलिसांनी या घटनेशी संबधित सर्व सह आरोपींचा शोध घेऊन संबधित सर्वांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी मृत साहिलच्या नातेवाइकांनी केली आहे.

या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे व रोहाचे उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांनी नागोठणे पोलीस ठाण्यास भेट देऊन या घटनेची माहिती घेतली. याप्रकणी आरोपी प्रितेशला अटक करून त्याच्यावर नागोठणे पोलीस ठाण्यात खून व जबरदस्तीने चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयाने ५ सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक राजन जगताप हे स्वतः या गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

दरम्यान नागोठण्यात गुप्तपणे सुरु असलेली चरस, गांजा या नशेली पदार्थांची विक्री तसेच नागोठणे व वाकण येथे सुरु असलेला चक्री जुगार अशाप्रकारच्या व्यसनांच्या आहारी तरुण पिढी जात आहे. अशाप्रकारच्या नशेतूनच आपण काय करतोय याचे भान या तरुणांना राहत नसल्यानेच खून करण्यापर्यंत त्यांची मजल जात असल्याची चर्चाही नागोठण्यात होत आहे. तर रोहावाल्या नागोठण्यातील चक्री जुगार वाल्याने या घटनेनंतर लगेचच आपले संगणक व इतर सामान रातोरात रोहाला का हलविले ? असे अनेक प्रश्नही प्रश्नही उपस्थित होत असल्याने पोलिसांनी याप्रकरणाच्या खोलवर जाऊन तपास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## प्रेयसीचा खून करून मृतदेह जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मुरुड पोलिसांनी याप्रकरणी सचिन थळे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उप विभागीय पोलीस अधिकारी जयदिश काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन गवारे, एएसआय सचिन वाणी, सुरेश वाघमारे, सागर रोहेकर, विलास आंबेतकर, सागर रसाळ यांनी आरोपीला पकडण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली.

## मुंबई-पुणे एक्सप्रेसवर अपघातात ट्रक चालकाचा मृत्यू

रस्त्याचे बाजूला घेवून सुरक्षित ठिकाणी उभे करण्यात आले आहे. यावेळी पळस्पे पोलीस उपनिरिक्षक वसंत केसरकर, पळस्पे मोबाईल स्टाफ, पनवेल तालुका पोलीस स्टेशन एपीआय भोईर यांच्यासह देवदूत रेस्क्यू टिम व खळ्ढ कंपनी स्टाफ हजर होते.पुढील कारवाई पनवेल तालुका पोलीस स्टेशन करीत आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे 'शिवतीर्थ'वर

साधून ही भेट घडली. या भेटीत आनंद दिघे साहेबांच्या आठवणींना उजाळा दिला. आम्ही सगळ्यांनी बाळासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली सानिध्यात काम केले आहे. राजसाहेबांनी बाळासाहेबांच्या मार्गदर्शनात राज्यभर काम केले आहे त्यामुळे या भेटीत बऱ्याच जुन्या आठवणी चर्चेत आल्या असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी म्हटलं.

लाडके मुख्यमंत्री कोण हे जनता ठरवते. जी संधी मिळाली त्याचे सोनं करण्यासाठी काम सुरू आहे. आमचं मंत्रिमंडळ सर्वसामान्यांच्या हिताला प्राधान्य देणारे आहे हे जनतेला दिसत आहे. त्यामुळे अत्यंत कमी कालावधीत धडाडीचे निर्णय आमच्या सरकारने घेतले आहेत असं सांगत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अप्रत्यक्षपणे उद्धव ठाकरेंना टोला लगावला. वरळीतील बॅनरवरून एकनाथ शिंदेंना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता त्यावर त्यांनी उत्तर दिले.

# विवाहित बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील करंजाडे वाधिवली वाडा येथे राहणारी एक विवाहित महिला कोणास काही न सांगता कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अल्पूती गजानन गायकवाड वय २० वर्षे, उंची ५ फूट १ इंच, बांधा सडपातळ, वर्ण निम गोरा, चेहरा उभट, नाक सरळ, केस काळे, कानात रिंगा असून अंगात गुलाबी रंगाचा पंजाबी ड्रेस गळ्यामध्ये मंगळसूत्र, पायात जोडवी-पैंजण व राखाडी रंगाची चप्पल घातलेली आहे.

या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोईस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोना विष्णू गावडे यांच्याशी संपर्क साधावा.

# माथेरानच्या प्रशासक सुरेखा भणगे यांच्या कडून गणेश विसर्जन स्थळाची पाहणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जन करण्यात येणाऱ्या विसर्जन स्थळाची पाहणी नगरपरिषदेच्या प्रशासक तथा कार्यक्षम मुख्याधिकारी सुरेखा भणगे- शिंदे यांनी आपल्या अधिकारी, कर्मचारी वर्गाला सोबत घेऊन उशिरापर्यंत विविध ठिकाणी जाऊन समक्ष पाहणी केली आहे. येथील वॉटर टँक( बालदी ) या ठिकाणी सर्वच गणेश विसर्जन करण्यात येते त्याचप्रमाणे मागील काही वर्षांपासून इंदिरा गांधी नगर येथील (गळती)हरिसन स्प्रिंग या ठिकाणी त्या भागातील गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात येत असते त्या ठिकाणी सुध्दा सुरेखा भणगे यांनी जाऊन पाहणी केली आहे.

गणेश विसर्जन वेळी सुरळीत विद्युत पुरवठा त्याचप्रमाणे रस्त्यांची साफसफाई बाबत भणगे यांनी सर्व कर्मचारी वर्गाला सूचना देऊन ही कामे पूर्ण करण्यात आली आहेत.पूजेचे निर्माल्य पाण्यात टाकल्याने कचरा साठू नये यासाठी त्या निर्माल्यापासून खतनिर्मिती करण्यात येणार असल्याचे सुरेखा भणगे यांनी सांगितले. यावेळी त्यांच्या सोबत नगरपरिषदेचे बांधकाम अभियंता स्वागत बिरंबोले, अकाऊंटंट अंकुश इचके, पाणी पुरवठा अधिकारी अभिमन्यु येळवंडे, अन्सार महापुळे, ज्ञानेश्वर सदगीर उपस्थित होते.




## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे : गिरवले, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे हक्क नोंदीस वर्णन असलेली **श्री.धनाजी नारायण राजगुडे** यांचे नावे असलेली मिळकत त्यांचेकडून आमचे अशिल **सौ.वनिता उमेश मुंडे, श्री.सलाहुद्दीन मेहबुब खान, २ ए, मु.हाऊस नं.९, नुर हाऊस (बी), वाय.एम.सी.ए.रोड, मुंबई-४०००८** यांनी सदरची मिळकत पूर्ण मालकी हक्काने कायम खरेदी घेणेचे निश्चित केले आहे. त्या मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन : मौजे : गिरवले, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| गिरवले | १३८ | १ | ०-५३-६०<br>पो.ख.०-०३-८०<br>एकूण ०-५७-४० | ७.०० |
| **पैकी मिळकतीचा अविभक्त हिस्सा क्षेत्र ०-३८-००, पो.ख.०-०२-०० एकूण क्षेत्र ०-४०-०० गुंठे, आकार ४.९६ यापैकी २० गुंठे क्षेत्र** | | | | |

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत सर्व हक्क हितसंबंधासुद्धा बरोबस्त

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ (एकविस) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडून सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकत निर्वेध बोजारहीत व खरेदी देण्यास योग्य आहे असे समजून आम्ही सदरचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करणार आहोत व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित तक्रारी, हरकती कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल. हे सर्व लोकांस कळावे.

ठिकाण : पनवेल

तारीख : ०१/०९/२०२२

**श्री.इब्राहीम अब्दुल रशिद भुसारी**
**बी.कॉम एल.एल.बी. ॲडव्होकेट**

**सही/-**
**श्री.अब्दुल रशिद भुसारी**
**बी.कॉम (ऑनर्स)**
**एल.एल.बी.ॲडव्होकेट**

**मु.शिळगाव, पो.शिळफाटा (खोपोली), ता.खालापूर, जि.रायगड**
**मोबाईल : ९१५८७६६७८६/९७६६०२०७८६**


# कामावर गेलेला इसम घरी परतलाच नाही

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कामावर जातो असे सांगून घराबाहेर पडलेला इसम अद्याप घरी न आल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. पितांबर कोंडीबा पाखरे (५८) रा.सेक्टर ५ करंजाडे, असे या व्यक्तीचे नाव असून उंची साडेपाच फूट, रंग सावळा, केस साधारण, चेहरा रुंद, डोळे लहान, मिशी जाड, नाक सरळ असून अंगाने मजबूत आहे. तसेच अंगात चॉकलेटी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकती या माझे अशिल **श्री.निखिल रसिकलाल माखेचा** यांच्या संपूर्ण व एकमेव मालकी हक्क, अधिकार व कब्जेवहिवाटीतील मिळकती आहेत.

**मिळकतीचे परिशिष्ट**
**तालुका : पनवेल, जि.रायगड यांच्या**
**हद्दीतील असलेली खालील वर्णनाची मिळकत**

| मौजे/गाव | सर्व्हे नं. |
|---|---|
| वारदोली | ४१/१, ४१/३, ४१/४, १०९/४ |
| वाजापूर | ६/१, ६/२, ६/३, ११ |
| देवद | ६० |
| पनवेल | ७३/अ ३+४+१ ब |
| पालीबुद्रुक | ९३/० |

तमाम जनेस सावधान केले जाते की, सदर मिळकतींबाबत माझे अशिलांच्या संमतीशिवाय कोणत्याही अन्य इसमांबरोबर वर नमूद केलेल्या मिळकतींची खरेदी-विक्री, हस्तांतरण, तारण, गहाण, बक्षिस, अदलाबदल किंवा तत्सम कोणत्याही प्रकारचा करार-मदार अथवा व्यवहार करू नये, अस कोणताही करार-मदार अथवा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर व अवैध असा राहील व सदरचा व्यवहार हा माझे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. तसे झाल्यास माझे अशिल अशा सर्व इसमांविरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करतील, याची नोंद घ्यावी.

तारीख : ०२/०९/२०२२

**सही/-**
**स्मिता म्हात्रे**
**(वकील)**
**१४७, द्वारकास रतनशी मेन्शन, कलेक्टर ऑफिस जवळ, ठाणे (प.) ४००६०१**
**फोन नं.०२२-२५३४१९२९**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com



पनवेल येथील सुधीर देशमुख यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराज



पनवेल येथील रामदास शेडगे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराज



पनवेल येथील डी.आर.भोईर यांच्या निवासस्थानी विराजमान झालेले गणराज



म्हसळा येथील पत्रकार उदय कळस यांचे निवासस्थानी विराजमान पूर्णपणे पर्यावरणपूरक श्री गणराज



नेरेपाडा येथील पंकज तांबडे यांच्या घरी विराजमान झालेले बाप्पा



मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत सदस्य सौ.वर्षा विलास दिवेकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न झालेली गणरायाची मंगलमूर्ती



साईनाथ यादव ममताबादे यांच्या उरण शहरातील देऊळवाडी येथे घरी विराजमान झालेली गणेश मूर्ती. गणेश मूर्तीचे दर्शन घेताना साईनाथ ममताबादे व पत्रकार विठ्ठल ममताबादे.

# खिडकीवाटे आत प्रवेश करून मोबाईल चोरणारा गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील करंजाडे येथील एका इमारतीच्या ब्लॉकमध्ये खिडकीवाटे आत प्रवेश करून घरातील मोबाईल फोन व इतर साहित्य चोरणाऱ्या चोरट्यास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले आहे.

करंजाडे येथील सेक्टर ५ येथे राहणाऱ्या शिवानी सावंत यांच्या दुसऱ्या मजल्याच्या घरामध्ये खिडकीद्वारे आरोपी बिरेंद्र रामबहोर इद्रा (२०) हा आत शिरुन त्याने घरात असणारे मोबाईल फोन व इतर साहित्य असा मिळून जवळपास २९ हजाराचा ऐवज चोरुन नेला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय जोशी, पोलीस उपनिरीक्षक अभय शिंदे, पोलीस हवालदार राऊत, पो. ना.परेश म्हात्रे, देशमुख, वायकर, पारधी, पो.शि.पारासूर, घरत आदींच्या पथकाने सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे सदर आरोपीबद्दल माहिती घेवून त्याला ताब्यात घेतले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे.

# लोखंडी पाईपची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजामधील एका कंपनीमधील लोखंडी पाइपाची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

तळोजामधील इनरपक सोल्युशन कंपनीमध्ये अज्ञात चोरट्यांनी रात्री कंपनीचे शटर तोडून आतमधील ३५ हजार रुपये किमतीचे बांधकाम साहित्य चोरून नेले आहे. जवळपास २९ लोखंडी पाइप चोरून नेले असून याविषयी तळोजा पोलीस स्टेशनमध्ये घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

# कर्जत तालुक्यातील ग्रामपंचायतीमध्ये जलसंजीवनी प्रकल्प



**दै.रायगड नगरी । कर्जत**

युनायटेड वे ऑफ मुंबई संस्थेच्या अंतर्गत जलसंजीवनी हा प्रकल्प कर्जत तालुक्यातील तीन ग्रामपंचायतीच्या मध्ये सुरु करण्यात आला आहे. जलसंजीवनी प्रकल्प अंतर्गत कर्जत तालुक्यातील ग्रुप ग्राम पंचायत खांडस, अंभेरपाडा, नांदगाव या ग्रामपंचायतीचे निवड करण्यात आलेली आहे.

ग्रामपंचायत खांडस व नांदगाव येथे ग्राम सभा आयोजित करण्यात आली होती त्या मध्ये जलसंजीवनी प्रकल्पाचे जलसंजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक प्रदीप क्षीरसागर, उपप्रकल्प व्यवस्थापक एम.एस कांबळे, समूह संघटक विवेक कोळी, कृषी तज्ञ जोएब दाऊदी व समूह सहायक संतोष काटे आदी उपस्थित होते.

ग्रामसभेमध्ये प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या गावांमध्ये प्रकल्पाच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या सर्व कामांची माहिती देण्यात आली व मार्गदर्शन करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने मृदा व जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, पाणी ताळेबंद, क्षमता बांधणी व जनजागृती, हवामान अनुकूल शेती व शेतीपूरक व्यवसाय या घटकांची माहिती देण्यात आली. तसेच तुषारसिंचन पद्धतीची शास्त्रीय माहिती देण्यात आली असून गरजू शेतकऱ्यांना संच वाटप करण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले. प्रामुख्याने खांडस गावातील सरपंच मंगल ऐनकर, उपसरपंच अंकुश ऐनकर, ग्रामसेवक एम.ए.कुटे, अंगणवाडी सेविका आणि गावातील ग्रामस्थ व तसेच नांदगाव ग्रा.प. ग्रामसभे मध्ये सरपंच श्रीमती कारोटे, उपसरपंच, ग्रामसेविका श्रीमती पाटील, प्रगतीशील शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# किरकोळ वादातून महिला बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरघुती किरकोळ वाद विवाद झाल्याने एक विवाहित महिला मनात राग धरून राहत्या घरातून कोणास काही न सांगता निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

आंबू रामू मंडल, वय २२ वर्षे, राहणार - कातकरवाडी, पनवेल, उंची ५ फूट, बांधा सडपातळ, वर्ण निम गोरा, चेहरा उभट, नाक सरळ केस काळे, नाकात मुरणी, अंगात नेसून पिवळ्या व गुलाबी रंगाचा मिक्स पंजाबी ड्रेस तसेच गुलाबी रंगाची ओढणी व पायात चॉकलेटी रंगाची चप्पल आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोईस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोना विष्णू गावडे यांच्याशी संपर्क साधावा.

# सुधागड तालुक्यात मनसेच्या सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात मनसेच्या प्राथमिक सदस्य नोंदणी अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

पालीसह सुधागड तालुक्यातील बहुतांश गावांत मनसेचे सदस्य नोंदणी अभियानाचे फलक लावण्यात आले आहेत. शिवाय मनसे पदाधिकारी व कार्यकर्ते गावागावात तरुण व नागरिकांसोबत संवाद साधत आहेत. त्यामुळे बहुतांश लोक मनसेचे सदसत्व स्वीकारत आहेत.

या अभियानासाठी मनसे तालुकाध्यक्ष सुनील साठे पाली शहर अध्यक्ष दिपेश लहाने, सुधागड तालुका मनविसे सचिव भावेश बेलोसे, चव्हाणवाडी शाखा अध्यक्ष परेश वनगले, जांभूळपाडा शाखा अध्यक्ष रोहित यादव, यांच्यासह राजेश कदम, रुपेश दळवी, समीर लोंढे, राज यादव, प्रमोद पार्टे, सनी यादव व पियुष खंडागळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मेहनत घेत आहेत.


## जाहीर नोटीस

अणुशक्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कोळखे, (नोंदणी क्रमांक आरजीडी/पीडब्ल्यूएल/एचएसजी (टिसी) ५५८ दिनांक १०/०२/९२), सर्व्हे क्रं.१०३/१ ते १०३/६, मौजे : कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६. येथील सदर गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाच्या कामासाठी बांधकाम क्षेत्रातील प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंन्स्ट (पुनर्विकास प्रकल्प व्यवस्थापक) (**PMC**) म्हणून नेमणूक करावयाची आहे. हे काम करण्यात स्वारस्य असणाऱ्या व कमीतकमी १५ (पंधरा) वर्षे बांधकाम क्षेत्रातील तांत्रिक अर्हता व व्यवस्थापकीय अनुभव असलेल्या कन्सल्टंन्स्ट व्यक्ती अथवा संस्था / कंपनी यांचेकडून या कामी देकार मागविण्यात येत आहेत. देकार स्वीकारण्याची अंतिम तारीख ही रविवार दि.२५/०९/२०२२ रोजी सककाळी ११.०० (**AM**) वाजेपर्यंत असेल. या कामासाठी असलेले देकार त्याच दिवशी सकाळी ११.३० (**AM**) वाजता उघडण्यात येतील व ते स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे सर्व अधिकार हे गृहनिर्माण संस्था स्वतःकडे राखून ठेवत आहे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/०८/२०२२

**सही/-**
**अध्यक्ष व सचिव**
**अणुशक्ती. गृह संस्था मर्या. कोळखे, पनवेल**
**मो.क्र.८१०८९११२६६/९८१९१२०९१०**



## सर्व शेअर्स/युनिट्स धारकांना तातडीची सुचना

अणुशक्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., (रजि. क्रमांक आरजीडी/पीडब्ल्यूएल/एचएसजी (टिसी) ५५८ दिनांक १०/०२/९२), पत्ता : मौजे : कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड

आम्ही अणशुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष व सचिव सदर गृहनिर्माण संस्थेचे सर्व शेअर/युनिट धारक/सदस्य/कब्जेदारांना अशी विनंती करतो की, आपण सर्वांनी दि.१३/०८/२०२२ रोजी घडलेल्या खालील अपघाताची सर्वांनी कृपया गंभीरतेने दखल घ्यावी.

दिनांक ०१/०९/२०२० रोजी कोळखे ग्रामपंचायतीच्या सुचनेनुसार-जावक क्र.९१/२०२०-२१ नुसार आपल्या सोसायटीच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत दिले होते. जे आपला संस्थेने मेसर्स बर्वे कन्सल्टंट्स, चेंबुर मुंबई, दि.०७/१२/२०२० यांचे मार्फत करून सबमिट केले. त्यवेळी त्यांनी अनपेक्षित घटना / अपघात टाळण्यासाठी संस्थेच्या सर्व इमारतींच्या मोठ्या तातडीच्या स्ट्रक्चरल दुरुस्तीची सुचना केली होती. त्यामुळे आपल्या सोसायटीने ०३/१२/२०२२ रोजी समितीच्या पटलावर २०१२ सालापासून असलेल्या STRUCTURAL REPAIRS आणि REDEVELOPMENT पुनर्विकासाच्या गंभीर मुद्यांवर चर्चा करण्यासाठी विशेष सर्वसाधारण मिटींग (S.G.M.) आयोजित करण्यात आली होती.

परंतु तेव्हापासून अनेक नोटीसी नंतरही आजतागायत कोणीही सदस्यांनी कोणतीही वर्गणी (CONTRIBUTIONS) किंवा कोणतीही अंतर्गत वैयक्तीक, दुरुस्ती अद्याप केलेली नाही आणि तसे सोसायटीला कळविलेले सुद्धा नाही. सर्वांच्या या घोर निष्काळजीपणामुळे आणि अशा महत्वाच्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात न घेतल्याने आणि त्याची प्राधान्याने दखल न घेतल्याने १३/०८/२०२२ रोजी आपल्या संस्थेच्या आवारातील एका इमारतीतील एका फ्लॅटच्या बेडरुमचा स्लॅब दुसऱ्या मजल्यावरुन खाली पहिल्या मजल्यावर पडला. देवाच्या कृपेने दोन्ही फ्लॅटमध्ये कोणीही नसल्यामुळे जिवीतहानी जवळपास चुकी होती. अन्यथा, रहिवाशांच्या जिवीताचे व इतर मालमत्तेचे फार मोठे नुकसान झाले असते. नजीकच्या भविष्यात अटळ असलेली अशी परिस्थिती आणि यापुढे गंभीर अपघात टाळण्यसाठी आम्ही तुम्हा सर्वांना नम्रपणे कळकळीची विनंती करत आहोत की, तुमच्या वैयक्तीक युनिट्स/फ्लॅट्सच्या मधील अंतर्गत तात्काळ दुरुस्तीची कामे अत्यंत तातडीच्या प्राधान्याच्या आधारावर करा आणि सामाईक तातडीच्या स्ट्रक्चरल दुरुस्तीसाठी एकमताने योगदान/वर्गणी द्या. तसेच सोसायटी इमारतींचा तात्काळ पुनर्विकास करण्यास सहाय्य करा.

तसेच अशा धोकादायक आणि जिर्ण फ्लॅट्स/युनिट्स तात्काळ रिक्त करा, तसे न केल्यास, अशा फ्लॅट्स/युनिट्समध्ये राहणारे सदस्य/रहिवासी हेच कोणत्याही मालमत्तेचा किंवा जिवीताला काही नुकसान झाले तर त्यासाठी स्वतःच पूर्णपणे जबाबदार असतील. त्यामुळे पुढे जर असे काहीही घडल्यास अपली गृहनिर्माण संस्था त्यास जबाबदार राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/०८/२०२२

**सही/-**
**अध्यक्ष व सचिव**
**अणुशक्ती. गृह संस्था मर्या. कोळखे, पनवेल**
**मो.क्र.८१०८९११२६६/९८१९१२०९१०**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी १) कै.लक्ष्मण गोमा तारेकर तर्फे वारस १/१) श्री.अरुण लक्ष्मण तारेकर, १/२) श्रीमती.इंदुमती गोपाळ मुंगाजी, १/३) श्रीमती.कुसूम काशिनाथ पाटील, १/४) श्रीमती.अनिता अजित म्हात्रे, १/५) श्रीमती.अर्चना प्रल्हाद तारेकर, १/६) श्री.आनंद प्रल्हाद तारेकर, १/७) श्री.मिलींद प्रल्हाद तारेकर, १/८) श्रीमती.पल्लवी प्रल्हाद तारेकर, २) श्री.शरद गोमा तारेकर, ३) कै.कृष्णा गोमा तारेकर तर्फे वारस, ३/१) श्री.प्रकाश कृष्णा तारेकर, ३/२) श्री.दिपक कृष्णा तारेकर, ३/३) श्री.विनोद कृष्णा तारेकर, ३/४) श्री.अमर कृष्णा तारेकर, ३/५) श्रीमती. रुपाली विजय तांडेल, ३/६) श्रीमती.गंगुबाई कृष्णा तारेकर, सर्व रा.मु.पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या सामाईक मालकी वहिवाटीची मौजे : पारगांव-डुंगी, ता.पनवेल येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेली जमीन मिळकत आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पारगांव-डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| युनिट केस नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | सिडको फाईल नं. |
|---|---|---|---|---|
| पारगांव-डुंगी ४८ | १५ | १५ | ०-२५.० | ३४७० |
| | १५ | २४ | ०-२७.२ | |
| | ३१ | १/११ | ०-२०.६ | |
| | ३६ | १९ | ०-०८.२ | |
| | ३८ | ३ | ०-२२.६ | |
| | ५ | ६ | ०-२४.७ | |
| | ८ | १४ | ०-१७.० | |
| | ८ | ५ | ०-१५.५ | |
| | ९ | १ | ०-४८.९ | |
| | ९ | ५ | ०-१०.३ | |

वर नमूद मिळकत सिडको लि. यांनी साडेबावीस टक्के भूखंड योजनेंतर्गत संपादीत केलेली असून सदर संपादीत मिळकतींचे संपादनापोटी १) कै.लक्ष्मण गोमा तारेकर तर्फे वारस १/१) श्री.अरुण लक्ष्मण तारेकर, वगैरे यांस साडेबावीस टक्के भूखंड योजनेंतर्गत वाटप करण्यात आलेला मौजे : पुष्पकनगर, नोड (दापोली), ता.पनवेल येथील सेक्टर नं.४ मधील भूखंड क्र.७, क्षेत्र ३४७० चौ.मी. हा भूखंड आमचे अशिल आईजी इन्फ्रा एल.एल.पी. भागीदारी संस्थेतर्फे भागीदार, १) श्री.हुक्माराम मुलाराम चौधरी, २) श्री.सुखराज नगराज चौधरी, ३) श्री.अचलाराम अमराराम चौधरी आणि ४) श्री.रामलाल पन्नाजी चौधरी, पत्ता : आईजी कॉम्प्लेक्स, सेक्टर-२०, प्लॉट नं.५७ अे, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी विकसनाकरिता घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर भूखंडामध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्या प्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आमच्या वरीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील १) कै.लक्ष्मण गोमा तारेकर तर्फे वारस १/१) श्री.अरुण लक्ष्मण तारेकर, वगैरे यांचे मालकी हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर भूखंड विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.०१/०९/२०२२

**सही/-**
**श्री.विशाल अनंत मुंडकर, ॲडव्होकेट**
**शॉप क्र.२, पवन को.ऑप.हौ.सोसायटी,**
**कै.रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टा समोर,**
**पनवेल-४१०२०६, जि.रायगड**

# संक्षिप्त...

## महिलेची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली मध्ये एका महिलेची पैसे मोजण्याच्या बहाण्याने फसवणूक केल्याची घटना घडली आहे.

कळंबोली सेक्टर ३ मध्ये राहणारी महिला कार्यालयात जाण्यासाठी अभ्युदय बँकेच्या बसस्टॉपवर उभ्या होत्या. त्यावेळी अज्ञात दोन व्यक्तींनी तेथे येऊन त्यांच्याकडील पैसे मोजून देण्याचा बहाणा करून त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांचे ३७ हजार रुपये किमतीचे दागिने हिसकावून नेले. याविषयी कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इमारतीवरून खाली पडून इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बांधकाम चालू असलेल्या इमारतीवरून झोपेत चालत जाऊन एक इसम खाली पडून त्यात त्याचा दुर्दैवी मुत्यू झाल्याची घटना पनवेल परिसरात घडली असून त्याच्या न नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहे.

सदर इसमाचे नाव राजू चक्रवर्ती (अंदाजे वय ४५ वर्षे), डोक्यावरील केस मध्यम काळे, नाक सरळ, दाढी मिशी काळ्या रंगाची बारीक, चेहरा उभट, रंग सावळा, उंची अंदाजे ५ फूट असून अंगात करड्या रंगाचा फुल बाह्यांचा शर्ट व निळ्या रंगाची हाफ पॅन्ट घातलेली आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी ०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक दयानंद महाडेश्वर यांच्याशी संपर्क साधावा.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# कंटेनर-टेम्पो अपघातात एक ठार ; दोन जखमी

**दै.रायगड नगरी । महाड**


महाड तालुक्यातील दासगाव हद्दीत ट्रक आणि कंटनेरमध्ये समोरासमोर धडक झाली. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला तर दोघेजण गंभीर जखमी झाले. हा अपघात गुरुवारी (दि.१) पहाटे चार वाजण्याच्या सुमारास झाला.



मुंबईहुन गोव्याकडे जाणार्या कंटेनरने मुंबईकडे जाणार्या आयशर टेम्पोला जोराने धडक दिली. अपघात एवढा भीषण होता की, दोन्ही गाड्यांचे प्रचंड नुकसान झाले. या धडकेत आयशर टेम्पोचालक अशोक गोविंद बारगीर (रा. दासगाव) जागीच ठार झाला तर टेम्पोमधील प्रवासी महफुज मजिदुल्ला खान (रा.नागलवाडी महाड) तसेच कंटेनरचालक दिनेश कुमार बीजनाथ यादव (रा.बिहार) हे दोघेजण गंभीर जखमी झाले. अपघातानंतर सुमारे दीड तास कंटेनरचालक हा गाडीत अडकला होता.

अपघाताची माहिती मिळताच महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एम.पी. खोपडे सहकार्यांसह घटनास्थळी पोहचले. त्याचबरोबर महामार्ग वाहतूक पोलीस शाखा महाडचे पोलीस हवालदार मंदार लहाने सहकार्यांसोबत घटनास्थळी पोहोचून त्यांनी जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. तसेच महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. त्यानंतर अडकलेल्या कंटेनर चालकाला अथक प्रयत्न करून बाहेर काढून त्याचे प्राण वाचवले.

# इर्टिगा कार दुचाकी स्वरावर धडकली ; ३ गंभीर







**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

कोलाड रोहा मार्गावरील पाले बु .हद्दीतील माशन भूमिसमोर बुधवार दि.३१ऑगस्ट रोजी दुपारी ३.१० वाजण्याच्या सुमारास इर्टिगा कार क्र.एम एच ०६सीडी १६१२ही कार रस्त्याच्या परिस्थितीचा अंदाज न घेता विरुद्ध साईडला जोरदार वेगाने जात असताना रोहा बाजूकडील येणारी पॅशन प्रो.मोटार सायकल क्र.एम एच ४७/एम ४८८१हिस समोरून धडक दिल्याने यातील मोटार चालक स्वार व त्याचे दोन साथीदार यांना गंभीर दुखापत झाली असून सदर दुखापत ग्रस्थांना पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार कोलाड कडून रोहा कडे जाणाऱ्या दिपक दत्तात्रय नाईक आदर्शनगर,भुनेश्वर, रोहा यांच्या ताब्यातील इर्टिगा कार हिने राँग साईडला जाऊन रोहा कडून येणाऱ्या मोटार सायकलला धडक देऊन अप- घात नरेश यशवंत कडव(वय ३६),गणेश गोविंद कडव (वय ३८), विनोद सखाराम दहिंबेकर (वय ४०)हे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी पाठवण्यात आले असून अधिक तपास परी पोसइ श्री फडतरे व पोहवा आर आर राऊळ करीत आहेत.

# दासगावमध्ये वीज कोसळली

**दै.रायगड नगरी । महाड**

दासगाव मोहल्यामध्ये रिमझिम पाऊस पडत असताना मोठा धमाका झाला. सोबत काही सेकंद संपूर्ण परिसर प्रकाशमय झाला. मोहल्ला वस्तीत अचानक वीज कोसळली मात्र जीवितहानी झाली नसली तरी एका घरातून आगीचा गोळा एक बाजूने शिरून दुसर्या बाजूने बाहेर पडला आणि नारळाच्या झाडाला जाळून टाकले. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ज्या घरामध्ये आगीचा गोळा शिरला त्या घरातील इलेक्ट्रिक वस्तू जळून गेल्या. घटनेच्या वेळी त्या घरामध्ये तीन लहान मुले आणि त्यांची आई असे चार लोकांचे कुटुंब वास्तव्य करत होते. घटनेची माहिती मिळताच महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. या घटनेमुळे ज्यांचे नुकसान झाले आहे, त्यांचे महसूल विभागाकडून पंचनामे करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.




CIDCO
WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.
# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## PUBLIC NOTICE

**Town Planning Scheme No. 08 (TPS-08)**

**UNDER SECTION 60(2) READ WITH SECTION 62 OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966**

**No. CIDCO/NAINA/CP/ BN-36/TPS-08/2022/1688**

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/UD-12, dated 10 th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27.04.2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, and also vide Notification No. TPS. 1215/245/C.R. 332/16/EP/UD-12, dated 01.03.2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP under Section 31(1) of the said Act;

And whereas, the Board of CIDCO vide Resolution No. 12287, dated 16.01.2020, had declared its intention under sub-section (1) of Section 60 of the said Act, for making Town Planning Scheme No. 08 at Part villages of Pali Khurd, Moho, Chikhale and Belavali of Taluka – Panvel, District Raigad and a notice about declaration of making Scheme No. 08 has been published in the Extraordinary Official Maharashtra Government Gazette (part-II) dated 28.01.2020 as well as in the daily newspapers "Ram Prahar" and "Lok Drushti" in English and Marathi dated 03.02.2020 under sub-section (2) of Section 60 of the said Act;

And whereas, in accordance with the amended provisions of section 148(A) of the said Act, vide Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Act.2020 (Maharashtra Act No. XIX of 2020), in computing the period, in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period of periods during which any action could not be completed under the said chapters, due to enforcement of any Guidelines or lockdown measures by the Government of India or the state Government, as the case may be, to prevent the spread of any pandemic or epidemic or disaster situation arising in the Country or State shall be excluded;

And whereas, such prescribed time limit is still in existence on excluding the period of lockdown declared due to spread of Covid-19 virus in the State of Maharashtra, by the Government from 23/03/2020;

And whereas, the Board of CIDCO vide Resolution No 12551, dated 02.04.2022 had delegated the powers to VC&MD, CIDCO for inclusion of additional area in declared scheme and declaring intention of making Town Planning Scheme of this additional area;

And whereas, VC&MD, CIDCO in accordance with the powers delegated by CIDCO Board accorded approval vide CIDCO/DP(NAINA)/TPS-8/2022/E-139887 dated 12.08.2022 for inclusion of additional area of part villages Wangani Tarf Waje, Ambivali and Lonivali of Taluka – Panvel, District Raigad (as shown on map) in Town Planning Scheme no. 08 declared in Maharashtra State Govt. Gazette on 28.01.2020 under Section 62 of the said Act, and its declaration of intention for making of Town Planning Scheme under Sub Section (1) of the Section 60 of the said Act;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub Section (2) of the Section 60 read with Section 62 of the said Act, the Corporation hereby publishes its declaration of making Town Planning Scheme (TPS) No. 08 with additional area at part of Villages Wangani Tarf Waje, Ambivali and Lonivali of Taluka – Panvel, District Raigad as shown on declaration map.

Land owners who are having valid building permission obtained from Competent Authority, falling within the boundary of proposed TPS No. 08 of part villages Pali Khurd, Moho, Chikhale, Belavali, Wangani Tarf Waje, Ambivali and Lonivali of Taluka – Panvel, District Raigad are requested to submit details of the same to NAINA office. Participants having land ownership jointly or severally willing to obtain a single final plot are requested to submit their consent under section 65 of the said Act for providing single plot preferably within 15 days.

In accordance with the provisions of Section 60(3) of the said Act, a copy of the declaration along with the plan showing the additional area to be included in the Town Planning Scheme No. 08 (shown by PINK border) is kept open for inspection by the public in the office of Chief Planner (NAINA), 8th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400 614 during office hours.

Copies of the plan showing the area to be included are also kept for inspection in the Grampanchayat offices of the villages included in the said Town Planning Scheme. Copy of the notice & plans are also available on CIDCO's website http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx.

The area included in the Town Planning Scheme 10 is bounded as stated below;

On the North - Town Planning Scheme No.06 and boundary of Matheran Eco-sensitive Zone (MESZ)

On the East - Boundary of MESZ, Integrated Township Project (ITP) at Village Lonivali

On the South - Boundaries of TPS-9, TPS-1 and TPS-2 (Pocket -2) falling in villages Sanagade and Belavali

On the West - Boundary of Mumbai- Pune Expressway at village Chikhale

By the order of Board of Directors of the Corporation.

**(Ravindrakumar M. Mankar)**
**Chief Planner (NAINA)**
**Town Planning Scheme No. 08 (TPS-08)**

**Date : 22.08.2022**
**Regd. Office : Nirmal, 2nd floor, Nariman point, Mumbai-400021**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574

**www.cidco.maharashtra.gov.in**

## जाहीर सूचना

**नगर रचना परीयोजना क्रमांक ०८ (टीपीएस-०८)**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ६२ च्या अनुषंगाने कलम ६० च्या उपकलम (२) नुसार**

**क्र. सिडको/डीपी(नैना)/टीपीएस-०८/२०२२/१६८८**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२, दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) (येथून पुढे महामंडळ असे निर्देशित करण्यात येईल) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१२१५/२४५/ सीआर -३३२/ २०१५/एस.एम./यूडी -१२, दिनांक २७.०४.२०१७ नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे. आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२ दिनांक ०१.०३.२०१९ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उपकलम (१) नुसार अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२२८७ दिनांक १६.०१.२०२०अन्वये रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील पाली खुर्द, मोहो, चिखले, आणि बेलवली यांच्या काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक ०८ करण्याकरीता, उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार त्याचा उद्देश घोषित केला आहे. आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (२) मध्ये नमूद तरतूदीनुसार टीपीएस - ०८ करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक २८.०१.२०२० रोजीच्या असाधारण अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात (भाग -२) आणि स्थानिक वृत्तपत्र "राम प्रहर"आणि "लोक दृष्टी" यांत दिनांक ०३.०२.२०२० रोजी प्रकाशित करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन रचना (सुधारणा) अधिनियम २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १९) द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८ (अ) मधील सुधारित तरतुदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतुदीप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठीचा कालावधी विचारात घेताना, देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्या रोगाच्या फैलावास किंवा आपत्ती जन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरिता, भारत सरकारने किंवा, याथास्थितो, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे, उक्त प्रकरणानुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकली नसेल तर, असा कालावधी वगळणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विहित कालावधी, महाराष्ट्र राज्यात दि. २३.०३.२०२० पासून कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी वगळता अजून अस्तित्वात आहे;

आणि ज्याअर्थी सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र. १२५५१ दिनांक ०२.०४.२०२२ अन्वये घोषित केलेल्या नगररचना परीयोजनेत वाढीव भागाचा समावेश करण्यासाठी आणि या वाढीव भागात नगररचना परीयोजना करण्याचा उद्देश घोषित करण्याचे अधिकार उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना दिले आहेत;

आणि ज्याअर्थी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक ०२.०४.२०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून क्र. सिडको/नैना/२०२२/E-१३९८८७ द्वारे दिनांक १२.०८.२०२२ रोजी, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २८.०१.२०२० रोजीच्या राजपत्रात घोषित केलेल्या नगररचना परीयोजना क्रमांक ०८ मध्ये रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील वांगणी तर्फ वाजे, अंबिवली, व लोणिवली गावांच्या काही भागाच्या (नकाशात दर्शविल्या प्रमाणे) समावेशासाठी उक्त अधिनियमातील कलम ६२ नुसार मंजूरी दिली आणि उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार सदर भागात, नगररचना परीयोजना करण्याचा उद्देश घोषित करण्यास मंजूरी दिली आहे;

आता, म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ६२ च्या अनुषंगाने कलम ६० च्या उपकलम (२) द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील वांगणी तर्फ वाजे, अंबिवली, व लोणिवली गावांचा काही भाग (नकाशात दर्शविल्या प्रमाणे) नगररचना परीयोजना क्रमांक ०८ मध्ये समावेश करून, सदर भागात नगररचना परीयोजना करण्याचा इरादा घोषित करत आहे.

प्रस्तावित टीपीएस नं. ०८ मध्ये समाविष्ट पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील पाली खुर्द, मोहो, चिखले, बेलवली, वांगणी तर्फ वाजे, अंबिवली, व लोणिवली गावांच्या काही भाग जमिनीवर सक्षम प्राधिकारीकडून वैध बांधकाम परवानगी मिळाली असल्यास अशा परवानगीचा तपशील नैना कार्यालयाकडे सादर करण्याची जमीन मालकांना विनंती करण्यात येत आहे. योजनेत सहभागी असलेल्या जमीन मालकांची संयुक्तीकपणे किंवा वैयक्तिकरित्या जमीन असेल आणि असे जमीन मालक एकच अंतिम भूखंड मिळविण्यास इच्छुक असतील तर त्यांना उक्त अधिनियमाच्या कलम ६५ नुसार एकच अंतिम भूखंड मिळणेसाठी शक्यतो १५ दिवसांच्या आत संमती देण्यास विनंती आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (३) च्या तरतुदींनुसार, नगररचना परीयोजना क्रमांक ०८ मध्ये वाढीव भागाच्या समावेशाची घोषणा व त्यामध्ये अंतर्भूत करण्यात येणारे क्षेत्र (गुलाबी रंगाच्या सीमेने) दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत जनतेच्या तपासणीसाठी मुख्य नियोजनकार (नैना), ८वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

विषयांकित परियोजनेचे सिमाक्षेत्र दर्शविणारा नकाशा संबधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात तपासणीसाठी उपलब्ध राहतील. सदर सुचना व नकाशा सिडकोच्या संकेतस्थळ http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx. येथे सुद्धा उपलब्ध राहतील.

नगर रचना परीयोजना क्रमांक ०८ मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या चतु:सिमा (वाढीव क्षेत्रासह) खालीलप्रमाणे आहेत.

उत्तरेला - नगररचना परीयोजना क्रमांक ६ ची हद्द आणि माथेरान पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची हद्द

पूर्वेला - माथेरान पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची हद्द , एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाची हद्द

दक्षिणेला - नगररचना परीयोजना क्रमांक ०९, ०१ आणि ०२ (पॉकेट -२) ची हद्द (मौजे सांगाडे व बेलवली)

पश्चिमेला - मुंबई पुणे द्रुतगती मार्ग (मौजे चिखले)

सिडको संचालक मंडळाच्या आदेशानुसार.

**(रविंद्रकुमार म. मानकर)**
**मुख्य नियोजनकार (नैना)**
**नगर रचना परीयोजना क्रमांक ०८ (टीपीएस-०८)**

**दिनांक : २२.०८.२०२२**
**नोंदणीकृत कार्यालय : निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०००२१**

**CIDCO/PR/217/2022-23**